# प्रकरण आठवे

## गिरिधरस्वामींची अप्रकाशित पदरचना व स्फुटप्रकरणे.

१) पदवाङ्मयाचे प्राचीनत्व, २) गिरिधरांच्या पदांची उपलब्धी व प्रेरणा, ३) गिरिधरांचे अभंगवाङ्मय, ४) ओवी, ५) स्थलमाहात्म्यपर पदे, ६) गिरिधरचरित आरत्या व आरतीची पद्धती, ७) श्रोत्यांसाठी पदे, ८) समारोप स्फुटप्रकरणे -- १) लोकस्वभाव, २) नानापंथ.

## प्रकरण आठवे

### गिरिधरस्वामींची अप्रकाशित पदरचना व स्फुट प्रकरणे

(१) पदवाङ्मयाचे प्राचीनत्व :

पदवाङ्मयाचे प्राचीनत्व शोधण्यासाठी 'पद' किंवा 'गीत' ह्या वाङ्मयप्रकाराचा मागोवा घेणे आवश्यक आहे. हा वाङ्मयप्रकार प्राचीन आहे याचे प्राचीनत्व अगदी वेदकाळापर्यंन्त नेता येईल तसेच ते लोकगीतातही शोधता येईल. लोकवाङ्मयाची अेक शाखा म्हणजे लोकगीते होत. आपल्या मनातील भाव वा ऊर्मी प्रकट करण्यासाठी वेदकाळात निरनिराळ्या ऋषिमुनींनी ज्या ऋचा म्हटल्या, त्या अेका अर्थाने पदस्वरूपच होत्या. ओव्या, गाणी, म्हणी, कहाण्या, कथा इत्यादींचा उपयोग भारतीयांनी आपल्या धर्मविचारात आजीव पद्धतीने केलेला आहे.

गीत किंवा पद हा वाङ्मयप्रकार मराठीतच रूढ होता असे नाही, तर अन्य भारतीय भाषातही रूढ होता. मनातील भावभावना ज्या परिस्थितीत व ज्या शब्दांमधून निर्माण झाल्या, त्या गीत ह्या संज्ञेस प्राप्त झाल्या. पद किंवा गीत हा वाङ्मयप्रकार महाराष्ट्रात निरनिराळ्या संप्रदायिकांनी समृद्ध केला. १६ व्या, १७ व्या व १८ व्या शतकात तात्त्विक ग्रंथनिर्मितीला उतरती कळा लागली होती. तर उलटपक्षी पदांचा अतीव भरभराट झाल्याचे जाणवते. या कालखंडावर जर एक नजर टाकली तर, कित्येक पदकारांची नावे आपल्यासमोर येतात. या तीन शतकात पदवाङ्मय समृद्ध झाले होते.

या पदांचा आश्रय मात्र अेकपुरी म्हणजे भक्तिमार्गी असा होता. भक्तीचे माध्यम म्हणूनच पदांचा उपयोग होत होता. मात्र शिवशाहीत भक्तीची जागा, ईश्वराच्या स्तुतीची जागा वीरांच्या वीरकथांनी घेतली, आश्रयाच्या संदर्भात थोडासा बदल झाला परंतु तरी ही भक्ती किंवा पदप्रकार खंडित झाला होता असे म्हणता येत नाही. पदातून 'भक्ती' होतीच तर काही पदातून

ईशस्तुतीही येत होती. म्हणजे पर्यायाने असे म्हणता येईल की, आतापर्यन्त पदांचा जो एकच मार्ग होता त्याचे क्षेत्रही व्यापक झाले व त्यात वैविध्यही आले. तसा हा वाङ्मयप्रकार भारतभर पसरलेला होता. नाथ, वारकरी, दत्त, महानुभाव, रामदासी इ. सांप्रदायिकांनी पदांची रचना पंथाचे तत्त्वज्ञान प्रसारित करण्यासाठी, ईशस्तुतीसाठी, भक्तीसाठी केली. आपली अनुभूती व्यक्त करण्यासाठी पदाचे माध्यम बहुतांशी साऱ्याच सांप्रदायिकांनी स्वीकारले. पदांची रचना बहुतांशी बहुजनसमाजासाठी, त्यांना भक्तीचे माहात्म्य पटविण्यासाठी, मोक्षाचा मार्ग दाखविण्यासाठी होत असे. अशा प्रकारच्या पदश्रवणाने श्रोत्यांना कवीला आलेला अनुभव सहज आकलन होत असे. अशा पदांच्या गायनातून व श्रवणातून श्रोत्यांच्या मनावर योग्य तो परिणाम सहज साधता आऊन पदकाराला अपेक्षित असा आशय समाजापर्यन्त सहज पोहचविता येत असे.

ज्या ज्या कालखंडात पदांची निर्मिती झाली असते त्या त्या कालखंडाच्या वाङ्मयविषयक निकषांवरच पदाचे सौष्ठव तपासून पाहणे योग्य ठरते. नंतरच्या कालखंडातील वाङ्मयाचे निकष त्याला लावू गेलो तर अन्यायाचे ठरेल. त्या त्या कालखंडातील अध्यात्मप्रवणतेचा, सामाजिकतेचा, राजकारणाचा परिणाम वाङ्मयावर होत असतो व तो त्याच्याशी संवादी पण असतो. ज्ञानदेव, नामदेव यांच्या पदांवर आध्यात्मिक व पारलौकिकतेचा पगडा अधिक होता. पदाचे बाह्य सौंदर्य, सूर, नाद, ताल, लय इ. गोष्टीविषयी त्या काळातील लोकांनी फारशी चिकित्सा केली असेल असे म्हणवत नाही. पदांच्या बाह्यसौंदर्याकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले नसले तरी ती पदे त्या गुणांनीही युक्त होती, हे लक्षात येते.

पारलौकिक तसेच आध्यात्मिक अनुभवाबरोबरच भाषेविषयी नंतरच्या कालखंडात पदकार जागरूक झाल्याचे लक्षात येते. आशयाबरोबर अभिव्यक्तीशीही पदकार संवादी राहू लागला होता. पदवाङ्मयाच्या या विविध वैशिष्ट्यांमुळे पदप्रसार होवू लागला होता.

## (२) गिरिधरांच्या पदांची उपलब्धी व प्रेरणा

वेगवेगळ्या कालखंडात साहित्यनिर्मितीची प्रेरणा किंवा प्रयोजन वेगळेच असते. त्या प्रयोजनाभोवती त्या कालखंडातील वाङ्मय रुंजी घालीत असते. मराठीच्या आरंभकालापासून मराठी वाङ्मयाची प्रेरणाही आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धाराचीही आहे हे आपल्या लक्षात येते. आरंभकाळातील वाङ्मय हे संतांनी व भक्तांनी आपल्या हृदयीच्या तळमळीने जोपासले होते. ईश्वरविषयक स्वतःची भावना व्यक्त करणे हा त्या वाङ्मयनिर्मितीचा मूळ उद्देश होता. मोक्षसोपानाकडे संतांना स्वतःस तर जावयाचे होतेच पण, आपल्याबरोबर रंजल्यागांजल्यांना, सामान्यांना पण न्यावयाचे होते. म्हणजे असे म्हणता येईल की, संतसाहित्याची प्रेरणा ही स्वोद्धार आणि लोकोद्धार हीच राहिली होती. त्यास अनुसरूनच ज्ञानेश्वर, नामदेवांनी निर्माण केलेली काव्यसंपदा आपण अभ्यासू शकतो. संतांच्या वाङ्मयात, साहित्यात भावनेचा ओलावा अधिक होता. ते साहित्य सहज स्फुरलेले होते, त्यात आलेले सौष्ठव नेणिवेतून आले होते. एकट्या ज्ञानेश्वरांना मात्र वाङ्मयाच्या सौष्ठवाची जाण होती. बाकीच्यांच्या वाङ्मयात सरलता, सहजता व अकृत्रिमता होती.

सांप्रदायिकांचे वाङ्मय मुळातच सहेतुकपणे निर्माण झालेले असते. प्रतिभेच्या उत्स्फूर्त भावनांचे आविष्करण त्यांच्या वाङ्मयातून निर्माण झालेले असते. पण त्या आविष्करणातून स्वतःचा उद्धार, पंथाचा प्रसार व लोकोद्धार कसा होईल याविषयी सांप्रदायिक जागरूक असतो. सांप्रदायिक आपल्या वाङ्मयातून पठनाची फलश्रुती सांगत असतो. मात्र गिरिधरही अपवाद कसे असतील ?

गिरिधर हे रामदासी पंथी असल्याकारणाने तसेच या कालखंडात सा-याच धर्मपंथांना उतरती कळा लागली असल्याकारणाने आपला पंथ, त्याचे

तत्त्वज्ञान हे कसे सुरक्षित राहील व प्रसारीत होईल असा विचार आपल्या गुरु रामदासाबरोबर त्यांनीही केल्यास आश्चर्य ते कोणते ! पेशवाईचा कालखंड हा पदनिर्मितीचा कालखंड असल्यामुळे हा वाङ्‌मयप्रकार आपल्या गुरुच्या (रामदासांच्या) मुळे गिरिधरांनीही जोपासला. त्यातून आपल्या पंथाचे तत्त्वज्ञान, गुरुमहिमा, लोकापर्यन्त कसा नेता येईल हाच विचार त्यांच्या समोर होता. पंथप्रसाराचे ध्येय समोर ठेवूनच त्यांना आपल्या गुरुने सदैव हृदयात स्थापिलेला आदर्श पुरुष श्रीरामचंद्र याचा आदर्श लोकांसमोर ठेवला होता त्यावर अनेक पदरचना करुन त्यांनी जनजागृती केली.

आमन्याचे संत एकनाथाप्रमाणेच मनोरंजनाच्या माध्यमातून उपदेशाचे तत्त्व त्यांनी (गिरिधरांनी) अंगीकारिलेले दिसते. म्हणून त्यांनी लोकानुरंजन करणारे अनेक काव्यप्रकार जाणीवपूर्वक हाताळले. येथे गिरिधरांची मर्यादा निश्चित आहे, आपल्या प्रतिभेचा आवाका त्यांना नक्कीच जाणवला होता म्हणून त्यांना डोंगरे, भूपाळी, आरती, पाळणा, अभंग, श्लोक, रूपिका, स्तोत्रे, डफगाणे वित्यादितून आपला विचार लोकाभिमुख केला. उपर्युक्त पदवाङ्‌मयाची विविधांगे गिरिधरांना जोपासण्याचा प्रयत्न केला तरीही या सा-या गिरिधरांच्या साहित्यनिर्मितीचा केंद्रबिंदू मात्र 'गुरु' हाच आहे हे लक्षात आल्याचाचून राहात नाही. त्यांचा पदेच काय सारेच वाङ्‌मय 'गुरु' या आसाभोवती फिरताना आढळेल. पदवाङ्‌मयातून गिरिधर विविध भूमिका जगताना दिसतील पण त्या भूमिका जगत असतानाही ते 'गुरुस' क्षणभरही विसंबले नाहीत हे ध्यानात येते. श्री स्वरापेक्षाही गुरुचे मोठेपण हे अगाध आहे, असीम आहे ही त्यांची श्रध्दा आहे. 'आम्हा तारक सदगुरुपाय', गुरु मोठा आहे, गुरुपदात लीन झाल्याने जन्ममरणाच्या फे-यातून माणूस सुटतो ही जाणीव गिरिधरांनी पुरीपुरी आळवली आहे. आपल्या साहित्य निर्मितीतून गिरिधरांना गुरुमहिमा गायिला आहे, केवळ पूजेच्या भावनेतून गायिला आहे असे नव्हे तर स्वतःस विसरुन गुरुरुपातच सारी तत्त्वे पाहून गायिला आहे, हे जाणवत राहते.

गिरिधर हे रामदास पंथीय १७ व्या शतकात होअून गेले. अुत्तरार्धाच्या शतकातील कवी व संत असूनही ~~त्यांच्याविषयी चरित्रविषयक किंवा~~ त्यांच्या वाङ्मयविषयक समग्र माहिती फारशी अुपलब्ध होत नाही ही खेदाची गोष्ट आहे. त्यांची हिंदी व मराठी कि. १५०० वर पदे असावीत. पण त्यातली थोडीच अुपलब्ध झाली आहेत. समीक्षकाचे किंवा टीकाकाराचे ह्या सा-या पदांकडे फारसे लक्ष गेलेले आढळत नाही. वाङ्मयेतिहासकारांनी सुद्धा फारशी दखल घेतली नाही, हे लक्षात येते. अेकंदरीत हा कवी काहीसा अुपेक्षितच राहिला.

धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता मंदिरात बीड येथील सीताराम पंत यांची बरीच बाडे सापडली. पण त्यातील बरीच बाडे जुनी अगदी फाटक्या स्थितीत आणि कागद अतिजीर्ण ~~फाटक्या~~ म्हणून वाचता आली नाहीत. ~~काही~~ धुळे येथील सत्कार्योत्तेजक सभेने त्यांचा रामायण, निवृत्तीराम, श्लोकत्रयाचे, समर्थप्रताप अित्यादि छोटीमोठी प्रकरणे प्रसिद्ध केली आहेत. पण त्यात गिरिधरांचे स्वतःची अशी चरित्रविषयक काहीच माहिती मिळू शकली नाही. अभ्यासाच्या सोयीसाठी गिरिधरांच्या पदांची विभागणी आशयाच्या अनुषंगाने केली आहे.

(3) गिरिधरांचे अभंगवाङ्मय

स्फुट गेय रचनेला 'पद' असे म्हटले जात असले तरी, अभंगापासून तो प्रकार निराळा आहे. अभंग हा अेक छंद प्रकार आहे. भक्तिभावाचे वाहन असलेला अभंग हा अेक छंदप्रकार आहे. मराठी लिखित वाङ्मयाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे १२ व्या, १२ व्या शतकात या काव्यप्रकाराने जोर धरला होता. वारकरी संतांमुळे अभंग प्रकाराला अेक विशिष्ट अधिष्ठान प्राप्त झाले होते. अभंग हा कवीच्या मनातील भक्तिभावाचे प्रकटीकरण करणारा, अेक आगळे भावविश्व निर्माण करणारा, असे समीकरण या काल-खंडात आढळते. तो अेक स्वतंत्र कविता असते. अभंगातील भावानुभव हा

कवीचा 'अेक' स्वतंत्र अनुभव असतो म्हणूनच तो अेक छंदप्रकार असूनही आपले अेक वेगळे असे अस्तित्व टिकवून आहे. आपल्या अनुभवाचे वळण स्पष्टपणे प्रकट झाल्याशिवाय अभंग पुरा होत नाही. त्यात ध्रुवपद नसते. गिरिधरांनी आपल्या गुरूचा महिमा वर्णन करणाऱ्या प्रकरणातून अभंग ह्या वाङ्मय प्रकाराचा अुपयोग केलेला जाणवतो.

(४) सौरी

सौरी म्हणजे स्वैरिणी. अीश्वरप्राप्तीसाठी स्वैराचार करायलाही सिध्द झालेल्या स्त्रीच्या भूमिकेतून गिरिधरांनी काही पदांची रचना केलेली आढळते. असार संसारात माझे मन रमत नाही, त्या पासून दूर कुठेतरी जावे असे वाटत आहे म्हणून मी परपुरुषाकडे आकर्षिले गेले आहे. हा परपुरुष कोण तर तो परमात्मा, परब्रह्म, जगन्नियंता. ह्याच्याकडे मला जायचे तर आहे, पण मला मार्ग ठाअुक नाही. ह्या पदाचा अभ्यास करताना मधुराभक्तीचा आविष्कार जाणवतो.

(५) स्थलमाहात्म्यपर पदे

सतराव्या शतकातील कवींनी त्या कालखंडातील काव्याची, पदांची जी जी वैशिष्ट्ये रूढ होती त्या साऱ्या वैशिष्ट्यांचा जाणतेपणाने वा अजाणतेपणाने आपल्या वाङ्मयनिर्मितीत अुपयोग केला. वास्तविक पाहता, प्रत्येक कालखंडात जो अेखादा श्रेष्ठ वाङ्मयसेवक असेल, त्याने ज्याप्रकारची वाङ्मयनिर्मिती केली असेल तिचे अनुसरण बहुतेक कवी करीत असतात. ज्ञानेश्वर कालात ज्ञानेश्वरांनी ज्या प्रकारच्या अभंगाची रचना केली होती आणि त्यामध्ये जी विविधता जाणवत होती तिचाच स्वीकार समकालीन संतांनी केला हे आपल्या लक्षात येते.

पूर्वकालीन व समकालीन संतांबद्दल आदर ज्याप्रमाणे गिरिधरांच्या पदातून व्यक्त झाला असेल त्याचप्रमाणे विशिष्ट स्थलाबद्दल, देवतांच्या स्थानाबद्दल

अतीव श्रद्धेने आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केली. देवतेच्या किंवा श्रेष्ठ व्यक्तीच्या भावाबद्दल, जो प्रेमभाव उफाळून आला तो शब्दातून व्यक्त झाला.

तीर्थक्षेत्राचा महिमा सांगणे, हे प्राचीन काळापासून रूढ आहे. महानुभावीय लोकांनी मराठी भाषेची व मराठी वाङ्मयाची आपोवपूर्वक जी ओपासना केली, त्यात स्थलमाहात्म्यही आहे.

गिरिधरांच्या कालात पदवाङ्मयात विविधता होतीच. या काळात पदवाङ्मयाचे वाङ्मयरूप प्रातिनिधिक होते. काव्यविषयाच्या बाबतीत आपण जुने पद्धू नये म्हणून प्रत्येक कवीने वाङ्मयनिर्मिती केली. पदे, आरत्या, गौळणी, विराण्या, कूटे, तात्त्विकरचना, व्यक्तिमाहात्म्ये, स्थलमाहात्म्ये या विषयांच्या भावती या काळातील काव्य फिरत होते.

गिरिधरांनीही *'काशीयात्राकथन'*, रामेश्वरयात्रा, पंढरपूर, तुळजापूर वित्यादि स्थलवर्णन मोठ्या जिव्हाळ्याने लिहिलेले त्यांच्या पदांतून आढळते.

(६) गिरिधररचित 'आरत्या' :
(अ)

परमेश्वराला, चैतन्यशक्तीला शरण गेलेला भक्त, साधक त्याचे स्तुतिस्तोत्र गात असतो. त्याची महती डोळ्यासमोर ठेवून त्याच्या रूपगुणवर्णनात धन्यता पावतो. संकीर्तनासाठी निर्माण झालेल्या या उत्स्फूर्तभावनेला स्तोत्राचे स्वरूप येते. आपल्या मनातील आर्त तो परमेश्वराचे गुणगान करून व्यक्त करतो. या आर्ततेतून स्वतःच्या मनोभावना व्यक्त करतो. परमेश्वराचे श्रेष्ठत्व आणि स्वतःचे कनिष्ठत्व त्याला सतत जाणवत असते. या भक्तिभावनेतून प्रकट झालेला अनुभव आर्त शब्दात व्यक्त होत असतो. तीच 'आरती' होय असे म्हणता येईल. परमेश्वराचे गुणगान करणे नवे नाही. ती परंपरा अतिशय जुनी आहे. वैदिक काळापासून या विषयीचे संदर्भ सापडतात. परमेश्वप्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या आरतीचे मूळ वेदात सापडते. "हे परमेश्वरा ! तू सर्वांचा नियंता आहेस. माझ्यात असलेली दुराचारी वृत्ती घालव आणि सत्प्रवृत्ती निर्माण कर. मी तुझे सतत चिंतन आणि

अनुकरण करीन आणि असे सुचरित झालेले जीवन भोगून मी तुझे पद प्राप्त करीन." १

मानवी मन हे कधी तत्त्वशोधी तर कधी भावयोगी असते. धार्मिक क्षेत्रात मनाच्या दोनही प्रवृत्ती दिसून येतात. महाराष्ट्रात असलेल्या निरनिराळ्या संप्रदायिकांनी - नाथ, वारकरी किंवा भागवत, रामदासी वि. आपापल्या विष्टदेवतांची स्तुति-सुमने उस्फूर्ततेने काव्यात गुंफली आहेत. 'आरती' हा गीतप्रकार मुळातच भावनानुकूल. ती तिच्या नावाप्रमाणे भावनेवर अधिष्ठित असते. देवदेवतांची 'आरती' करणे हा भक्तिसंप्रदायातील अतिशय महत्त्वाचा विधी आहे.

(अ) आरतीची पद्धती :

विशिष्ट ताला-सुरात हा प्रकार गायिला जातो. गेयता हा आरतीचा अविभाज्य घटक आहे. 'आरती करणारा' तसेच त्याच्या बरोबर 'आरती म्हणणारे' यांच्यात एकतानता साधली जाते. सारेच वातावरण भक्तिमय, एकरूप झाल्याचे जाणवते. जसजशी आरतीची लय वाढत जाते, तसतसे भक्ताचे तन, मन त्या गीताशी तादात्म्य पावते. या आरती म्हणण्याच्या विविध पद्धतीवरून काही छंद व जाती निर्माण झाल्या.

आरतीचे विविध प्रकार आहेत. 'काकड आरती', 'ओवेपारती', 'शेजारती', 'धुपारती', 'दीपारती' वित्यादी.

गिरिधरांनी लिहिलेल्या आरत्यांची संख्या अतिशय अल्प म्हणजे १/ १ च आहे. त्यांत तुळजापूरच्या जगदंबेची व एक शेजारतीहा उपलब्ध आहे.

(ब) श्रोत्यांसाठी पदे :

गिरिधरांच्या वाङ्मय प्रकारात रचनाप्रकारांची जी विविधता आढळते, तीमध्ये डोहाळे, चूर्णिका, डफगाणे, भजन, भूपाळी, आर्या, सवैय्या, पदे, फुगडी, मुडा, पिंगा, ललित, पाळणा वित्यादि विविध प्रकार जाणवतात. ही पदे

बव्हंशाने श्रोत्यांसाठीच निर्माण झाली आहेत. सर्वसामान्य लोकांना धर्मपंथाची जाणीव व्हावी हा हेतू मनाशी बाळगून ही पदरचना केली आहे. आपला अनुभव आणि रामदासी पंथीय तत्त्वज्ञान श्रोत्यांच्या मनावर ठसविण्यासाठी हे लेखन झाले आहे. 'श्रोता' हे पदनिर्मितीमागचे प्रमुख कारण होते. ह्या कालखंडात जे जे पदकार झाले त्यांना ऐकणारा विशिष्ट श्रोतृसमुदाय होता. विश्व मोहरे लावण्याची कुवत ह्या पदकारात व त्यांच्या वाङ्मयात नव्हती. आपली भरारी त्यांनी ओळखली होती. त्यामुळे सामान्यजनसमुदायापुढे त्यांना पेलेल असा उपदेश सामान्य भाषेतून करून त्यांचा उद्धार करावा हाच हेतू उराशी बाळगून निरनिराळ्या पदकारांनी कार्य केले. त्यात गिरिधरांचाही समावेश होतो.

(८) समारोप :

गिरिधरांच्या स्फुट काव्याचा अभ्यास करताना जाणवले की त्यांची पुष्कळशी पदे गुरुसंबंधी (रामावर) च आहेत. कलापूर्णता ~~फारशी~~ त्यांच्या पदात फारशी जाणवत नाही. कारण पदांच्या सौष्ठवाकडे, वाङ्मयसौंदर्याकडे कवीचे मन फारसे आकर्षित होत नाही. कारागिरीपेक्षा उस्फूर्त आविष्करणावरच गिरिधरांचा अधिक भर दिसतो. मात्र कांही पदातून शब्दचमत्कृती, अलंकरण जाणीवपूर्वक करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. पण तेथे त्याची ही कृती कृत्रिम आहे हे जाणवते. त्यांची काही पदे गेय आहेत. आजही काही विशिष्ट प्रसंगी मठातून ती गायिली जातात.

त्यांच्या पदांची आशयदृष्ट्या विभागणी करून त्यात कशी विविधता आहे. ह्याबाही आपण विचार केला. प्रचलित असलेल्या सा-या पदप्रकारांना त्यांनी जाणीवपूर्वक हात घातला आहे. हे वैशिष्ट्य लक्षात घ्यावे लागेल.

अभिव्यक्तीच्या दृष्टीनेही गिरिधरांनी आपल्या पदांतून विविधता आणण्याचा प्रयत्न केला. स्तोत्रे, आरत्या, ओवी, अभंग, आर्या, पाळणे, डोहाळे, भजने, भुपाळी हे सारे तत्कालीन पदप्रकार त्यांनी जोपासले. आपल्या प्रतिभेच्या भरारीला झेपावतील अशाप्रकारच्या रसांचा (भक्ती आणि वीर) व

अलंकरणाचा आविष्कार आणि भाषेचे वेगळेपण हेही त्यांच्या पदातून जाणवत रहाते. पदांचे बाह्य व अंतरंग लक्षात घेत असतात. गिरिधरांचे केंद्रीत सारेच साहित्य 'गुरु' ह्या केन्द्रबिंदू भोवती फिरताना आढळते.
(ह्या प्रकरणात ज्या रचनांचे विवेचन केले आहे ती सर्व अप्रकाशित पदे पुढे परिशिष्ट १ ले यामध्ये दिली आहेत.)

(१) लोकस्वभाव :

हे गिरिधरांचे अवघे १५ ओवींचे छोटेसे प्रकरण आहे. यांत गिरिधरांनी तत्कालीन जनस्वभावाचे वर्णन केलेले दिसून येते. गिरिधरांचा काल हा मुस्लीम अमदानीचा, जिकडे तिकडे अंदाधुंदीचा. त्याचे वर्णन समर्थांनी आपल्या 'अस्मानी-सुलतानी' या काव्यांत मोठे मार्मिकतेने केलेले आहे.

जनस्वभावाचे वर्णन गिरिधर मोठ्या मार्मिकतेने करताना म्हणतात --

जो जो प्राणी जन्मासि आला । तो तो देहाभिमानेंचि गेला ।
त्यामध्ये कोणही विरळा । प्रबोधनिवळा निवळाला ।।१।।
जो तो म्हणे आम्ही थोर । कोण पाहे सारा सार ।
माझा वर्तणूक परपार । पावषोभाच्या ।।२।।
परपार हेंहि नाहीं । मोच अवघा सर्व कांही ।
साधुसंत कैचे कावी । कोठून आले ।।३।।

समर्थांच्या 'अस्मानी-सुलतानी' काव्यांत मुस्लीम राज्यकर्त्यांमुळे समाजांत माजलेल्या बेबंदशाहीचे वर्णन आहे. ~~माजली होती~~. जो तो शहाणा व स्वमताभिमानी झाला होता. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. ब्राह्मणांची जी हीन-दीन स्थिती झाली होती, ती तर बोलावयासच नको. तिचे वर्णन समर्थ करतात की,

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ।।[१]

'अन्न मिळेना खावया' अशी ब्राह्मणांची स्थिती झाली होती.

मतमतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला
जो जे मनीं सांपडला । तयास ते चि थोर ।।[१]

ह्या श्लोकाला अनुलक्षूनच गिरिधरांचे खालील श्लोक आहेत असे दिसते --

शूद्र निंदितो ब्राह्मणास । ब्राह्मण निंदितो वाणिकास ।
परस्परें यातायातीस । थोरपणें उडविती ।।४।।

कित्येक मूर्खपणाची सडाणे । स्पर्धा कुतर्क कुलक्षणें ।
समर्थे निरोपिली विचक्षणें । ग्रन्थांतरीं ।।६।।

वित्यादि रीतीने जनस्वभाव वर्णन करून शेवटीं गिरिधर श्रीसमर्थांचे स्तवन करितात --

सोपे बोलणे उमजावया । परत्रमार्ग समजावया ।
स्वभाव लोकीं पालटावया । केली दया दया करें ।।१८।।

स्वामी येवढें थोर नाहीं । प्रपंची तो सुख नाहीं ।
भक्तियोगें धन्य होती । उपाय लोकी ।।२१।।

धरितां समर्थांची कास । कुभाव पालटे निशेष ।
सद्भावे आपणचि जगदीशा । भेटताहे ।।२२।।

असे स्तवन करून गिरिधर सांगतात की, 'मला समर्थांचा आश्रय लाभला म्हणून, मी भाग्यवान आहे. ते सांगतात --

गिरिधर म्हणे समर्थांचा । आश्रय मजला स्वामियांचा ।
स्वामीकृपेनें लौकिकाचा । न्याय केला संपूर्ण ।।२५।।

## गिरिधरांचे अप्रकाशित वाङ्मय :

### (२) नाना पंथ -

गिरिधरांच्या काळांत परकीय आक्रमणामुळे निरनिराळे पंथ उदयास आलेले दिसून येतात. वैदिक धर्माची अवनती होत होती. आणि त्यामुळे इतर पंथ आपआपले डोके वर काढून सर्वांत आमचा पंथ चांगला असे जनसमुदायाला सांगत असे. श्रीसमर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे

'मतमतांचा गलबला कोणी पुसेना कोणाला'

अशाप्रकारची महाराष्ट्रात धार्मिक परिस्थिती होती. गिरिधरही त्याच काळात वावरत असल्यामुळे समाजातील ह्या अनेक पंथाविषयी त्यांनी आपल्या नाना पंथ ह्या प्रकरणांत निरनिराळी ~~सर्वसाधारणपणे~~ ५० कडवी लिहिलेली आहेत.

ज्याला त्याला आपआपला पंथ चांगलाच वाटत असतो व तो चांगला नसतो असे तरी कोणी म्हणावे ? परंतु ज्या पंथात ज्ञानप्राप्ति नाही ते सारे पंथ केवळ श्रमास कारण होतात, असे गिरिधर प्रतिपादन करतात.

ज्याचा पंथ त्यासि चांगला बहु चांगला कोणें नव्हे म्हणावे ।<br>
सात पांच पंथें चालिले लोक चालिले ज्ञानेंवीण शिणावें ।।८ ।।

आज समाजांत काय दिसते, त्याबद्दल ते निवेदितात -

दानकर्म कांही करावे । देव धरावे संसार करावा ।<br>
दिल्या कांही पुण्ये पावते । जन भावते पूज्य प्राप्ती व्हावा ।।९।।

गुरुहि करावे संसारी बुध्दि विचारी भाग्य वैभव येती ।।<br>
गुरु तो ही लाहावा असावा मंत्र फळावा इरिद्र हा भंगावे ।।१०।।

गिरिधर म्हणती वेर्थ शील होती वा धण्यम्हाशी न ही ।<br>
आजि च मुक्त कां व्हावे ही जन्मा यावें ही चराचराचे आहे ।।११।।

अशा त-हेने लोकांना वैभवाचे, श्रीमंतीचे आमिष दाखवून जनसामान्यांची फसवणूक हे भोंदू गुरु करतात.

उपासनाभेदेंकरून जरी निरनिराळे पंथ प्रचलित झाले असले, तरी ज्यांचा भर आत्मज्ञानावर आहे असे पंथ चांगले होत असे म्हणण्यास हरकत नाही. पण याशिवाय आणखी एक पंथ अनादि काळापासून चालत आलेला दिसतो व तो सर्व काळीं आणि स्थळीं फक्त बद्धांनाच प्रिय झालेला आढळतो ! तो असा -

आमुचा पंथ अम्हां चांगला बहु चांगला सांगणें चि न लागे ।
सुखरूप संसार करणे जन्ममरणे आणखी पंथ न लगे ।।

वित्तार्जन करवेल तितके करावे, विषयवासना तृप्त करवतील तितक्या कराव्या, संसाराचे कोड पुरवेल तितके पुरवावे व एके दिवशी आयकापोरे, घरदार, शेतीवाडी, धनधान्य, यांच्याकडे पहात, तळमळत, प्राण सोडावा ! ज्यांच्या हाती द्रव्याची जपमाळ व ज्यांना कांताध्यान व    बद्धांचाच हा बोलून चालून पंथ होय ! त्यांना दुस-या कोणत्याहि पंथाची अपेक्षा नसते, इतके ते आपल्या ठिकाणी तृप्त झालेले असतात ! हा पंथ निर्विवाद त्याज्य होय, पण ज्या पंथात परमार्थाच्या नावाखाली मनसोक्त आचार, एकंकार, भ्रष्टाकार यांना मुभा असते, ते हि पंथ त्याज्य होत. याखेरीज बाकी सारे पंथ, ज्यात शुद्ध आचार आहे, ज्यात भगवद्भक्ती आहे, गुरुसेवा आहे, ज्ञानार्जन आहे, ते सारे पंथ गिरिधर सांगतात की, चांगले आहेत.

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।।

त्या सर्वांचा निवाडा श्रीसमर्थांनी आत्मबोधात केला आहे. फक्त कोणत्याहि मताचा किंवा पंथाचा प्रत्यक्ष नामनिर्देश त्यांनी केला नाही, त्याविषयी गिरिधर निवेदितात -

नाना पंथ नाना मतें    असंख्यातें हीं समर्थांनि शोधिलीं ।
गीतार्थ शोधितां शोधितां बरें शोधिला शिष्यसृष्टी बोधिली ।।१८।।

यानंतर गिरिधरांनी महानुभाव, जटिल, बैरागी, लिंगायत, स्मार्त, वैष्णव, मध्ववैष्णव बित्यादि पंथाचे अेक अेका पदात वर्णन केले आहे. त्यातील थोडीशी पदें अवलोकन करु -

त्यापंथाविषयी ते वर्णन करतात -

नानक जटिल बैरागी योगी वितरागी घन त्यागीति अेक ।
धुम्रपानि गोराजनि हे निरंजनि हे धातुवादिति वेष ।।१।।
अघिर ... गगनि शाक्त हे शैव मुक्त हे पापपुण्य असेना ।
अेकेकार भ्रष्टाकार हे जनि फकार हे कुंचनिच दिसेना ।।२।।
खेचरि भुचरि चाचरि बहु गोचरि अगोचरि मुद्रेचे वेशपि ।
आसने साधिति शीघ्र बोधिति नाना ज्ञान मुद्रेचे ।।३।।
मंत्र यंत्र तंत्र सांगति लोक अेकति जप होम विधानें ।
जटिलाचा पंथ चांगला अल चांगला परि क्वण आहे ।
नित्य भस्म आंगी कुंढळचे नग्न फिरणे लाज सोडूनि पाहे ।।४।।
नखे केश मोठे काढति । हे ते कठिण कर्म तयाचे तप जन्माचे कोणते कुठेल येथे ।।५।।

## बैराग्याचा पंथ

बैराग तो यांचो भांडणे मोटि भांडणे हरी द्वारी होताति
संव्हाररुप हे शंकर लाधले वर गिरिधर म्हणति ।।५।।
बैराग्याचा पंथ चांगला अल चांगला मूर्ख लोकरुपाति ।
गोजोग भ्रष्टोत बोलिला पुढे चालिला विश्वलोक जाणति ।।६।।
नव्हे आपा कुग्रदर्शन शांतदर्शन हरीभक्त दिसति ।
हरीहरभेदनाहारे अरे पाहीरे भलेपणे असवि ।।७।।
हरिकिष्णा जय किष्ण स्मरणे हरि स्मरणे टिळे माळ धरणे ।

लिंगायतांच्या पंथाविषयी निवेदन करतात -

लिंगायाचा पंथ चांगला बहु चांगला गळा लिंगे बांधिति ।
शिव शिव शिव जन्म लिंग जंगम मेल्यामुळी घालिती ।
मेल्या शिव होति सर्व हो हे पुर्व हो शेव शुभरिति

स्मार्त वैष्णवाविषयी गिरिधर निवेदितात -

स्मार्त वैष्णव पंथ चांगला बहु चांगला कांही नो वाचि नाही ।
द्वारावति मुद्रे लावावि आणि पुन्हा विभस्मोध्दारण देही
विष्णुस्मरण मुखे करिति मुद्रा लाविति त्रयोदश बहारी ।
सदाशिव विष्णु शांभव हे येक येन लक्ष्मि कांत अंतरी ।
असला अग्रह निग्रह विग्रह येथे कांही असेना ।
जिकडे पडले तिकडे चांगले भक्ति लागले कांही भेद हो सेना ।
निराहार उपोशन हे ।।७।।

मध्ववैष्णवाविषयी गिरिधर निवेदितात -

शंखचक्रगदापद्मादी पदपद्महो आगी उभरति चिन्हे ।
मुद्रा द्वारावति शोभति कर्ण भुषीति मंजुरीया सुचिन्हे
मोक्षाचि उपेक्षा ज्याचि हो भक्ति याची हो वरिष्ट हे विष्णुचि
विष्णुपोटी यावे जावे हो सुख घ्यावे हा वैसी प्रिति ज्यांचि
गिरिधर मध्ववैष्णवाचिर वैष्णवा नमस्कार करोते
मुख्य प्राणनाथ स्मरणे जन्ममरणे रामरूपी हरी ते ।।

अशा त-हेने निरनिराळ्या पंथाविषयी वर्णन करून गिरिधर म्हणतात की, ज्ञानी लोकांचे पंथ चांगले, जेणे करून जनसमुदायाची उन्नति होऊन ते सदाभी होतील. देवकर्म करून त्यांना मोक्षाचे सुख मिळेल गीतेत, भागवतात, पुराणात वित्यादि ठिकाणी या निरनिराळ्या पंथाविषयी वादविवाद होऊन

जो पंथ मुमुक्षूंना आत्मज्ञान देईल व मोक्षसुख देईल तोच खरा श्रेष्ठ पंथ म्हटला जातो. गिरिधर म्हणतात की, मी अज्ञानी परंतु समर्थांनी मला ज्ञानी केले. त्यांचा जो उदास पंथ, त्यांतील मठांची स्थापना, मारुती व रामजन्माचा उत्सव ह्यांनी मला शहाणे केले. संप्रदायींचा श्रीग्रंथराज दासबोध ह्याने मला आत्मज्ञान दिले. म्हणून दोन श्लोकांत दासबोधग्रंथाचा गौरव त्यांनी शेवटी केलेला आहे.

त्या उदासपंथाविषयी ते निवेदितात -

ज्ञानियांचे पंथ चांगले बहु चांगले लोक सज्ञान होति ।
देवधर्म तिचे करुनिया फिरुनि मोक्षभुवना येति ।
गीता भागवत पुराणे नाना पुराणे येथे निर्णय जाले ।
नाना पंथी नाना भेद हे देखे हे येथे बुडोनि गेले ।
गुरुगीतागर्भगीता हो हंसगीता हो यमगीतार्थ तेथे ।
भगवत गीता सम गीता हो नाना ।
जिवकोष शिवकोष हो ब्रह्म काज हो साधुविण कळेना ।
नानाशास्त्र केलि पठणे न पुजने आत्मज्ञान वळेना ।
गिरिधर म्हणे मी अज्ञान परिसज्ञान संति केले यथार्थी ।
भ्रमाचे धोके वारिले सर्व सारिले पंचिकर्ण भावार्थ ।
उदासि पंथी । उदास निस्पृह फिरति मठ धरिति
देवध्यासभरिता । रामनेमीचे हे उछाह मोठे उछाह
भूमिमध्ये करिती । चालिले चिंद्या छत्रे निशाणें
ढालध्वजा गुढ्यातोरणे जगोध्दारणे जयजयकारकिर्तने ।

अशात-हेनें उदासपंथ म्हणजे श्रीरामदासी पंथ ह्या पंथाचा गौरव करुन दासबोधाविषयीं शेवटी ते निवेदितात -

उदास ब्रह्मीचे निवाडे मोठे निवाडे ग्रन्थ पाहतां कळती ।
वेदांत सिध्दांत धादांत यांच्यापंथे कल्पवृक्ष फळती ।
दासबोधग्रन्थ निवाडा मोठा निवाडा मायाब्रह्म निरोपी ।
भावद्वाक्यें ग्रन्थ बोलिला पुढें चालिला गिरिधरदस्वरुपी ।।

अशा या दासबोध ग्रंथाला नमन करून हे प्रकरण संपविले आहे.

टीप : हे प्रकरण लिहितांना गिरिधरांची कडव्यांचे (पद्यांचे) आकडे नीट न दिल्यामुळे विवेचनातही आकड्यांचा उपयोग करता आला नाही.

• • •